NAVSHAKTI, SATURDAY FEBRUARY 25, 2017



कांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.
(छाया : बी. एल. सोनी)

## जुहू कोळीवाड्यात आज सी फूड फेस्टिव्हलचे आयोजन

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी) - जुहू कोळीवाड्यातील जुहू तारा कोळी समाज यांच्यावतीने २५ आणि २६ फेब्रुवारी रोजी दोन दिवसीय सी फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. येथील पुरातन जुहू कोळीवाड्यात प्रथमच सी फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात येत असल्यामुळे येथील कोळी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

येथील जुहू तारा रोड, हिराबुवा गावडे मार्ग, सांताक्रुझ पश्चिम येथे येत्या २५ आणि २६ रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री ११.३० पर्यंत येथे होणाऱ्या सी फूड फेस्टिव्हलमध्ये तांदळाच्या गरम गरम भाकरी, विविध माश्यांचे कालवण असलेले रुचकर ताजे सी फूड येथील सुमारे २५ स्टॉल्समधून ठेवण्यात येणार आहेत.

एकीकडे सी फूडचा आनंद लुटताना मुंबईचा मूळ नागरिक असलेल्या कोळी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले आहे तसेच येथील कोळी महिलांच्या खाद्य पदार्थांना बाजारपेठ मिळावी म्हणून येथे प्रथमच सी फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जुहू तारा कोळी समाजाचे अध्यक्ष प्रभाकर गावडे यांनी दिली.

## महाराष्ट्रातील पहिले मोडीलिपी स्नेहसंमेलन संपन्न




मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) - जगभरातील मोडी लिपीच्या कागदपत्रांचे लिप्यंतर करून खराखुरा इतिहास आणि दस्तऐवजांचा अमूल्य ठेवा जपायला हवा. त्यामुळेच सध्याच्या युगात मोडी लिपीचे संवर्धन आणि जतन ही काळाची गरज असल्याचे मोडी लिपीतज्ज्ञ महेश जोशी यांनी सांगितले. प्रत्येक विध्यार्थ्यांने मोडी लिपी शिकायला हवी, असे आवाहन जोशी यांनी केले. मंडळाचे माजी मंडळप्रमुख आणि मोडी लिपी प्रशिक्षक रामकृष्ण बुटे-पाटील गेली तीन वर्षे अखंडितपणे मोडीचा ध्यास घेऊन एक चळवळ म्हणून कार्य करीत आहे, असे प्रशंसोद्गार जोशी यांनी यावेळी काढले.

विद्यार्थी उत्कर्ष मंडळ आणि समर्थ ग्रंथालय संचालित आणि मोडी लिपी केंद्रातर्फे अलीकडेच डिलाईल रोड येथे आयोजित केलेल्या महाराष्ट्रातील पहिल्या मोडी लिपी प्रशिक्षणार्थी स्नेहसंमेलनात ते बोलत होते. मोडी लिपीच्या रौप्य महोत्सवी वर्गाचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन केले गेले होते. शिवजयंतीच्या निमित्ताने मंडळाचे माजी मंडळप्रमुख आणि कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते किशोर टापरे यांनी 'शिवरायांचे राज्यकारभाराचे नियोजन, कार्यपद्धती व अंमलबजावणी' असे विविध पैलू मांडून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. मंडळप्रमुख विकास शिंदे प्रास्ताविक करताना म्हणाले की, विभागातील सुजाण, सुसंस्कृत पिढी घडवण्याचे काम मंडळ गेली ६२ वर्षे अव्याहतपणे करत असून मंडळ विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात वेगवेगळे उपक्रम राबवत असते. शिवकालीन पत्रे आणि दस्तऐवजांचे प्रदर्शन यावेळी भरविण्यात आले होते. यावेळी गीत आणि पसायदान अंजली गोरेगावकर, बोधपटाचे वाचन प्रतिभा मिस्त्री यांनी तर सूत्रसंचालन राजाराम पाटील यांनी केले. मोडी लिपीसंदर्भात माहितीसाठी रामकृष्ण बुटे पाटील - ९००४२५५६४५ आणि सागर बोने - ८०८२४४१४८८ यांच्याशी संपर्क साधावा.

## ...नाट्याची घोषणा

ज्यांनी नुसता महाराष्ट्रच नाही तर अवघ्या हिंदुस्थानाला एक राष्ट्र म्हणून घडवले त्या सगळ्याची ही गाथा म्हणजे महानाट्य होय.

अनेक थोर साहित्यिक, नाटककार, संगीतकार, गायक, अभिनेते, शिल्पकार, चित्रकार, शास्त्रज्ञ, समाजसेवक आणि सामान्य माणूस या सगळ्याचा एक कोलाज म्हणजे हे महानाट्य असल्याचे प्रसिद्ध संगीतकार विश्वजीत जोशी यांनी सांगितले.

## ...खवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक

### बांधकाम व्यावसायिकाला अटक आणि न्यायालयीन कोठडी

यातील तक्रारदार योगेश रमाकांत राणे असून ते लालबाग येथील डॉ. बी. ए. रोडवरील तेजूकाय मेंशन इमारतीमध्ये राहतात. जानेवारी २००८ साली त्यांच्या वडिलांचे मित्र राजाराम चव्हाण यांनी त्यांची ओळख रविराज कन्स्ट्रक्शनचे मालक विनायक कानडे यांच्याशी करून दिली होती. लालबाग येथील गणेशनगरातील त्यांच्या कार्यालयात विनायकने त्यांना त्यांचे स्वप्नील काते या विकासकाच्या मदतीने लोअर परेल येथे एका 'एसआरए'मध्ये पुनर्विकासाचे काम सुरू आहे. या इमारतीमध्ये काही फ्लॅट असून ३०० फुटाच्या फ्लॅटसाठी त्यांना ९ लाख रुपयांची ऑफर दिली होती. नऊ लाख रुपयांमध्ये लोअर परेल येथे फ्लॅट मिळत असल्याने त्यांनी त्यांच्या पत्नी आणि इतर १२ जणांसाठी तिथे प्रत्येकी एक-एक फ्लॅट बुक केला. ५० टक्के आधी आणि नंतर उर्वरित रक्कम दोन वर्षांत देण्याचे ठरले होते. मात्र, दिलेल्या मुदतीत विनायक कानडे याने त्यापैकी कोणालाही फ्लॅट दिला नाही. त्याने फ्लॅटसाठी अशाच प्रकारे अनेकांकडून पैसे घेतले. जवळपास १ कोटी ३६ लाख रुपये घेतल्यानंतर त्याने या सर्वांची फसवणूक केली होती. हा प्रकार उघडकीस येताच योगेश राणे यांनी १८ नोव्हेंबर २०१६ रोजी काळाचौकी पोलीस ठाण्यात लेखी अर्जाद्वारे तक्रार केली होती. गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी अटक केली.

TATA

**TATA STEEL LIMITED**
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० (१) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि बीएसई लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध निर्गमित करण्यात आलेले पर्पिच्युअल हायब्रिड सिक्युरिटीजवरील वितरण थकीत खालीलप्रमाणे आहे :

| पर्पिच्युअल हायब्रिड सिक्युरिटीज (पीए-चएस) | रोजीस नियत वितरण | वितरण देयाकरिताची नोंदीत तारीख |
|---|---|---|
| दिनांक १८ मार्च, २०११ रोजीस वाटप पीए-चएस ११.८०% एकूण रु. १,५०० कोटी. (ISIN:INE081A08165) | १८ मार्च, २०१७ | १४ मार्च, २०१७ |

फेब्रुवारी 23, 2017
मुंबई

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम के
कंपनी सचिव

TATA STEEL